A 2 2

क्षयरोग, कॅन्सर इत्यादि दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या किंवा कायम स्वरूपाचे किंवा अंशत: अपंगत्व आलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या निवृत्ति वेतन-धारक विधवांना आर्थिक मदत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओजेस-१३८५/[२]/स्वा. सै. कक्ष,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २२. १. १९८६.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-पीओअस-१०८२/विक१/स्वा. सै., दिनांक ६. ९. १९८२ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:पीओअस-१२८३/ विक१/स्वा. सै., दिनांक २१. ११. १९८३ अनुसार निवृत्ती वेतनधारक स्वातंत्र्य सैनिकांना कायम किंवा अंशत: अपंगत्व आल्यास किंवा क्षयरोग, कॅन्सर इत्यादि सारख्या दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या निवृत्ती वेतनधारक स्वातंत्र्य सैनिकांना एकरकमी अनुदान रु. २०००/- देण्यात येते. निवृत्ती वेतनधारक स्वातंत्र्य सैनिकांप्रमाणे त्यांच्या निवृत्ती-वेतनधारक विधवांना देखील कायम किंवा अंशत: अपंगत्व आल्यास किंवा क्षयरोग, कॅन्सर इत्यादि सारख्या दुर्धर रोगांनी आजारी असलेल्या निवृत्तीवेतनधारक विधवांना आर्थिक मदत देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. त्यावर शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, निवृत्तीवेतनधारक स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांना दिनांक १. ५. १९८५ पासून त्यांना कायम किंवा अंशत: अपंगत्व आल्यास किंवा त्या क्षयरोग, कॅन्सर इत्यादि सारख्या दुर्धर रोगाने आजारी असल्यास वैद्यकीय उपचारार्थ त्यांना एकरकमी अनुदान रु. २०००/- देण्यात यावे.

(२) अशा प्रकारची आर्थिक मदत मिळण्यासाठी निवृत्तीवेतनधारक विधवांनी केलेल्या अर्जासोबत अपंगत्वाचा अथवा रोगाच्या निदानाबाबत व स्वरूपाबाबत, मुंबईमध्ये शासकीय रुग्णालयाच्या अधीक्षकाचे व जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हा शल्य चिकित्सकाचे प्रमाणपत्र किंवा त्यांनी प्रति स्वाक्षरीत केलेले खाजगी रुग्णालयाचे प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता आहे.

वर नमूद केलेला खर्च लेखाशीर्ष "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण [ई] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम-[सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तींना निवृत्तीवेतन या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली [मागणी क्र. १३]" ख्या खर्च खाती दाखविण्यात यावा व त्याखालील अनुदानातून भागविण्यात यावा.

कृ.मा.प.

उपरोक्त योजनान्वये अनुदान मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात येत आहेत.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनुमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-२०३४/व्यय-४, दिनांक ३.१२.१९८५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ का. क. धीजुरी ]
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
अध्यक्ष व इतर सदस्य, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व कोषागार अधिकारी,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग, ईरक्सपी-४, वित्त विभाग, जीईएन-५ [५ प्रतींसह],
सामान्य प्रशासन विभाग/का. क्र. २५,
माहिती व जनसंपर्क संचालनालय [प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी],
निवड फाईल.